**फौजदारी अर्ज (डी.व्ही.) क्र.१३५/२०२२**
**शुभांगी बाळू गावडे विरूध्द बाळू आवाण्णा गावडे व इतर.**

## निशाणी क्रमांक १२ वर आदेश.

कौटुंबीक हिंसाचार झाला करीता स्वत: व्यथित स्त्री आहे तसेच स्वत:चे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे असे कथन करत अर्जदार की जी उत्तरवादी क्र.१ यांची पत्नी आहे यांनी कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अर्ज दाखल करत विविध अनुतोषांची मागणी केली. मागणी केलेले इतर अनुतोष पुराव्याअंति प्रकरण गुणदोषावर निर्णयीत होतेवेळी दिले जातील तथापि, आता तातडीची बाब म्हणून अंतरिम पोटगी द्यावी अश्या अनुतोषाची मागणी केली.

**(२)** मुळ अर्ज, अंतरिम पोटगी मागणीचा अर्ज, उत्तरवादी यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे यासह संचिकेवर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले. सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**(३) मान्य व कबुल बाबी :—**

**(अ)** नातेसंबंध **(ब)** अर्जदार नोकरीस नाहीत. **(क)** उत्तरवादी हे शेती करतात. **(ड)** इतर फौजदारी अथवा दिवाणी प्रकरणामध्ये उत्तरवादी यांच्याकडून अर्जदार यांना खावटी/अन्नवस्त्राची रक्कम मिळत नाही असे कळविले.

**(४)** रजनीश वि.नेहा या न्यायनिर्णयामध्ये ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची पुर्तता म्हणुन उभय पक्षकारांच्या वतीने उत्पन्न व दायित्वाची शपथपत्रे दाखल.

**(५)** मुळात उत्तरवादी यांच्याकडे पुरेशी आर्थिक ऐपत या एकाच बाबीचा विचार करता अंतरीम पोटगीचा आदेश पारीत करता येणार नाही. कौटुंबीक हिंसाचार झाला आहे काय.? त्याकरीता न्यायालयाचे प्रथमदर्शनी समाधान होईल इतपत पुरावा आहे काय या बाबी पहाव्या लागणार आहे.

**(६)** अर्जदाराच्या वतीने युक्तीवाद की, उत्तरवादी यांनी अर्जदारांचा सांभाळ करण्यास उपेक्षा केली/नकार दिला. या ठिकाणी मी नमुद करतो की, मुळात प्रस्तुतचे प्रकरण हे फौ.प्र.सं.कलम १२५ प्रमाणे नाही. कौ.हि.म.र. अधिनियमा मधील तरतुदीनुसार दाखल प्रकरणामध्ये आदेश नोंदवितेळी कौटुंबीक हिंसाचार झाला काय.? मुख्यत्वे ही बाब पहाणे जरूरी. 'कौटुंबीक हिंसाचार' ही बाब 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' यापेक्षा भिन्न आहे. 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' याच्याशी त्याचा थेट संबध जोडता येणार नाही. त्यामुळे 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' यावरून खावटी देणे हे अधिकार क्षेत्राबाहेरील बाब आहे.

**(७)** कौटुंबीक हिंसाचार झाला काय.? याची उकल होण्याकरीता संचिकेवरील उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले. पैशाची मागणी, अपमानास्पद वागणूक, मारहाण, शिवीगाळ शारीरीक व मानसीक छळ असे थेट आरोप केले आहेत. कलम ३ मध्ये कौटुबींक हिंसाचाराची व्याख्या स्पष्ठ आहे. त्यामध्ये पतीने किंवा उत्तरवादीने केलेले कोणतेही कृत्य, लोप पावलेले कृत्य किंवा कृति किंवा वागणूक ज्यावेळी हिंसाचार म्हणून स्पष्ठ होईल अश्या वेळी पुढील गोष्टींचा हिंसाचार म्हणून ठरविला गेला आहे. आरोग्यास, सुरक्षीततेस, जीवीतवास किंवा स्वास्थ्यास, मानसीक किंवा शारीरीक दुखापती किंवा लैगीक गैरवर्तन, अवयवायांना दुखापत, शाब्दीक, भावनीक आणि आर्थीक गैरवर्तन या गोष्टींचा समावेश केला आहे. त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे, व्यथित व्यक्तीचा जीव धोक्यात आणण्यास भग पाडणे, तिच्या कोणत्याही दुखापतीस कारणीभुत होणे या बाबी देखील समाविष्ठ आहेत.

**(८)** उपलब्ध्द पुराव्यावरून कलम ३ प्रमाणे कौटुंबिक हिंसाचार झाला आहे ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होत आहे. अर्जदाराने केलेले सर्व विरूध्द कथन उत्तरवादी यांनी स्पष्ठ नाकारले आहेत. तथापि, ही बाब दुर्लक्षीत करता येणार नाही की उत्तरवादी व अर्जदार हे आज रोजी विभक्त राहत आहेत. कोणतेही भारतीय स्त्री कोणताही त्रास नसताना पतीचे घर सोडून स्वत:च्या मर्जीने विभक्त राहणार नाही.

**(९)** अर्जदार स्वत:च्या मर्जीने उत्तरवादी यांच्यापासून विभक्त राहत आहेत असे दर्शविणारा पुरावा संचिकेवर नाही. संचिकेवर अशी कोणतीही बाब नाही की

ज्यायोगे असे म्हणता येईल की, उत्तरवादी यांनी एकाच वेळी मोठी रक्कम अर्जदाराला दिली आहे किंवा पैश्याचे स्त्रोत असलेली एखादी मिळकत तिला दिली आहे आणि त्या रकमेचा विनीयोग करून अर्जदार स्वत:चा उदरनिर्वाह करू शकतात. अर्जदार नोकरीस आहे त्यांच्याकडे उत्पन्नाचे स्वतंत्र सधन साधन आहे असे देखील दिसून येत नाही. ती आजारी असल्याचे दिसून येते.

**(१०)** उत्तरवादी यांनीच अर्जदारांचा त्याग केला की अर्जदार स्वत:हून विभक्त राहत आहेत यासह तत्सम बाबींवर योग्य वेळी उहापोह केला जाईल. उत्तरवादी क्र.१ हा दूध डेअरीवर मदतनीस म्हणून काम करतो असे त्यांचेच कथन. <u>हरदेव सिंग विरूध्द उत्तर प्रदेश सरकार १९९५ क्री.लॉ.ज.१६५२</u> या प्रकरणामध्ये तर असे ठरविले की ''पती हा साधु जरी झाला तरी तो पत्नी व मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी टाळू शकत नाही.''. <u>संदिप वि.सुमन</u> या प्रकरणामध्ये ना. पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने असे ठरविले आहे की, स्वत:चा चरितार्थ चालविण्यास सक्षम नसलेल्या पत्नीस सांभाळणे ही केवळ कायदेशीर नाही तर नैतीक जबाबदारी आहे आणि पती हा प्रोफेशनल भिक्षूक जरी असला तरी तो ती जबाबदारी टाळू शकत नाही. या प्रकरणात तर उत्तरवादी तरुण आहेत. निश्चीतच कष्ट करण्याची धमक असलेले त्याचे वय आहे. <u>गजेंद्र सिंग यादव वि.श्रीमती बिंदु यादव, मणु/आर.एच /३११/२०१३</u> राजस्थान या प्रकरणामध्ये ठरविल्या प्रमाणे पत्नीचा सांभळ करणे ही पतीची जबाबदारी आहे. उत्तरवादी हे त्यांना खावटी देण्यास सक्षम असल्याचे दिसून येत आहे. उत्तरवादी याचे असे कोठेही म्हणने नाही की, अर्जदार व तो उभयतांच्या संमतीने विभक्त राहत आहेत. मुळात अंतरिम पोटगी मंजुर करण्याचा उद्येश हा टु प्रिव्हेंट द डेस्टीटयुशन व व्हॅग्रन्सी असा आहे.

**(११)** प्रकरणाची परिस्थिती पाहता, नातेसंबंध, दैनंदीन गरजाकरीता पैश्याची निकड याचा विचार केला. उत्तरवादी यांच्याकडे येणेप्रमाणे उत्पन्नाचे साधन दिसून येत आहेत. उभय पक्षकारांचे वय, सध्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी लागणार खर्च, त्यांचे उत्पन्न, त्यांच्यावर अवलंबुन असलेले सदस्य, दवाखाना करीताचा खर्च, या सर्व बाबी विचारात घेतल्या. दोन्ही बाजुंनी पुरावा नोंदविल्या

नंतर प्रकरण गुणदोषावर निर्णयीत केले जाणार आहे. त्यावेळी अंतरीम पोटगीच्या रकमेमध्ये कमी अधिक बदल देखील केला जावू शकेल. जर कौटूंबिक हिंसाचारच झाला नाही ही बाब सिध्द झाल्यास प्रकरण खारीज देखील केले जाईल. मतीतार्थ इतकांच की तात्पुरती व्यवस्था म्हणून सदरचा आदेश पारीत केला आहे. कोणतेही ठोस मत नोंदविलेले नाही. करीता आदेश.

## आदेश

**१.** अर्ज अंशत: मंजूर केला.

**२.** उत्तरवादी यांस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजे दि.१०/११/२०२२ पासुन अर्जदार यांना प्रतिमहा रक्कम रू.५०००/— प्रमाणे अंतरिम अन्न वस्त्राची रक्कम द्यावी.

**३.** या व्यतिरिक्त सदर अर्जाचा खर्च म्हणुन उत्तरवादी यांनी अर्जदारांस रक्कम रु.५०००/— द्यावी.

**४.** उत्तरवादी यांनी प्रस्तुत अर्ज न्यायप्रविष्ठ असताना अर्जदारास कोणतीही शारीरीक व मानसीक इजा पोहचवू नये, कौटूंबिक हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करु नये.

**५.** कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम, २००५ कलम २४ प्रमाणे आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

**६.** सदर न्यायनिर्णयाविरूध्द नाराज असल्यास उभयतांना मा.वरिष्ठ न्यायालयाकडे दाद मागता येईल.

**७.** संबधीत पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका—याने सदर आदेशाची अंमलबजावणी होण्याकरीता मदत करावी.

**८.** प्रकरण अंतिमत: गुणदोषावर निर्णयीत करतेवेळी, सदर आदेशामधील कोणतीही बाब उभय पक्षकारापैकी कोन्हासही पुरक अथवा बाधक राहणार नाही.

**९.** सर्व कायदेशीर मुद्दे खुले ठेवले.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GHULE GANESH AMBADAS
Date: 2024.04.05 12:33:59 +0530

( गणेश अंबादास घुले )
न्यायदंडाधिकारी वर्ग १, इचलकरंजी.

दिनांक : ०४/०४/२०२४.

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेमधील मजकूर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

लघुलेखकाचे नांव – संकेत संजय भोपळे
न्यायालयाचे नांव – ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग १, इचलकरंजी.

| | |
|---|---|
| आदेश दिनांक | : ०४/०४/२०२४. |
| पिठासिन अधिका–यानी स्वाक्षरी केलेला दिनांक | : ०५/०४/२०२४. |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेला दिनांक | : ०५/०४/२०२४. |